# भूमिगत मेट्रोला वेग

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई



अशाप्रकारच्या २४० व्होल्टच्या वाहिन्या आहेत

- पुढच्या टप्प्यातील इंटरनेटची कामे पूर्ण
- २४० व्होल्टच्या वाहिन्यांनी इंटरनेटला ऊर्जा
- दर ५०० मीटरवर वाहिन्यांची जोडणी



'आरे ते कफ परेड' या भूमिगत मेट्रो ३चा पुढील टप्पा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रशासनाची तारेवरची कसरत सुरू असतानाच, या टप्प्यातील इंटरनेटची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. जमिनीखाली सरासरी १८ ते २२ मीटरवर इंटरनेटसेवा देण्यासाठी तेथे २४० व्होल्टच्या वाहिन्यांनी इंटरनेटला ऊर्जा दिली जाणार आहे.

मेट्रो ३ ही देशातील १०० टक्के व राज्यातील सर्वाधिक लांबीची भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा आरे जेव्हीएलआर ते बीकेसी हा ७ ऑक्टोबर २०२४ला सुरू झाला. त्यामध्ये १२.६९ किमी अंतरात दहा स्थानके आहेत. आता आणखी १७ स्थानकांचा टप्पा सुरू होणे बाकी आहे. या १७ स्थानकांचा दुसरा टप्पा हा दोन भागांत सुरू होणार असून पहिला भाग बीकेसी ते आचार्य अत्रे चौक स्थानक (धारावी, शितलादेवी मंदिर, दादर, सिद्धीविनायक, वरळी व आचार्य अत्रे चौक स्थानक) असा सहा स्थानकांचा असेल. हा टप्पा मार्च २०२५पर्यंत सुरू करण्याचे नियोजन ही मार्गिका उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) केले आहे. या सहा स्थानकांदरम्यान इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठीचे काम पूर्णत्वास आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

या मार्गिकेत सौदी अरेबियातील एसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने अँटिने व रीपिटरद्वारे ऑप्टिकल फायबर वाहिनी बसविली आहे. याच प्रणालीच्या वापराद्वारे मेसर्स मायक्रोस्कॅन इन्फोकॉमटेक प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी प्रवाशांना नेटवर्क सुविधा देत आहे. त्यासाठी 'मल्टीप्लेक्सर' प्रणाली तेथे बसविण्यात आली आहे. इंटरनेट किंवा डेटा वापरकर्त्यांची संख्या वाढल्यानंतरही प्रवाशांना वेगवान इंटरनेट मिळण्यासाठी या प्रणालीचा वापर होणार आहे. त्यामध्ये वापरकर्त्यांची संख्या वाढली की, ऑप्टिकल फायबर वाहिनीतील प्रकाशाचे सिग्नल हे वाहिनीच्या एका टोकाकडे वेगाने जाऊन तेथून इलेक्ट्रिकल सिग्नलमध्ये परावर्तित होऊन परततील. ही प्रक्रिया अत्याधिक जलद होते व त्यातून वेगवान डेटा नेटवर्क व इंटरनेट वापरकर्त्यांना प्राप्त होऊ शकेल. या प्रणालीचा सक्षम वापर होण्यासाठी त्यांना वीज (ऊर्जा) प्रदान करणाऱ्या वाहिन्यांची कामे अलीकडेच पूर्ण झाली. इंटरनेला ऊर्जा देणाऱ्या या वाहिन्या २४० व्होल्ट क्षमतेच्या आहेत. रबराच्या आवरणातील या वाहिन्यांना जमिनीखाली प्रत्येक ५०० मीटरवर जोडणी देण्यात आली आहे. ५००-५०० मीटरच्या वाहिन्या प्रत्येक दोन स्थानकांमध्ये टाकण्यात आल्या आहेत. बीकेसी ते धारावी या स्थानकातील हे काम अलीकडेच पूर्ण झाले, अशी माहिती सूत्रांनी दिली.